## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी.

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की :-

माझे नांव : विनोद अनंत म्हात्रे

वय सुमारे : ४७ वर्षे

व्यवसाय : नोकरी

राहणार : बेलपाडा, पनवेल.

<u>शपथेवर सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता श्रीमती थळकर यांचे मार्फत.</u>

1. मला दोन एक मुलगा आणि एक मुलगी आहे. मुलाचे नाव रोहित तर मुलीचे नाव दिव्या आहे. सन २०१५ ला मी माझ्या कुटुंबासोबत बेलपाडा येथे राहात होतो. सन २०१५ ला दिव्या कॉलेजमध्ये ११ वी इयत्तेत शिकत होती. सन २०१५ ला दिव्याचे वय १७ वर्षे होते.

2. जेव्हा दिव्या सन २०१५ ला शिकत होती त्यावेळी मला दिव्याकडून कळाले की तिचे आरोपीसोबत प्रेमसंबंध होते. आरोपी शुभने दिव्याची फसवणूक केली होती. आरोपीने दिव्याला लग्नाचे वचन दिले होते. आता दिव्याचे दुस-या मुलाशी लग्न झाले आहे आणि ती सुखाने संसार करत आहे. तिला एक मुलगा आहे. माझे म्हणणे आहे की आता माझी मुलगी दिव्याचा संसार चांगला सुरू आहे आणि या केसमुळे पुढे जाउन तिचे नुकसान होउ शकते. आता आम्हाला ही केस पुढे चालवायची नाही. मला आठवत नाही की, पोलीसांना मी दिव्याच्या वयाबद्दल काही कागदपत्रे दिले होते का? आता मला चार्जशीटमधून झेरॉक्स कॉपी दिव्याचे १० वी ची शाळा सोडल्याचे लिव्हिंग सर्टिफिकेट आहे. मी पोलीसांना ही दिव्याची शाळा सोडल्याची झेरॉक्स कॉपी दिली होती. मुळ कॉपी ११ वीच्या ॲडमीशनला सी.के.टी कॉलेजला दिले आहे. या **दिव्याच्या १० वीच्या शाळा सोडल्याच्या लिव्हिंग सर्टिफिकेटच्या झेरॉक्स कॉपीला आर्टिकल 'ए'** देण्यात येते. (आरोपीच्या वकिलांनी आर्टिकल 'ए' देण्यास विरोध केला.) मी माझ्यासोबत आज रोजी सी.के.टी कॉलेजने दिलेले १२ वीचे लिव्हिंग सर्टिफिकेट आणलेले आहे. मी ते सर्टिफिकेटची प्रमाणीत प्रत कोर्टात दाखल करायला तयार आहे. (आजरोजी या साक्षीदाराने सरकारी वकिलामार्फत **निशाणी २२** च्या अर्जासोबत आणि **निशाणी २३** च्या लिस्टसोबत दिव्याचे १२ वीचे स्कुल लिव्हिंग सर्टिफिकेची कॉपी दाखल केली आणि याची मुळ सर्टिफिकेट सोबत आणले आहे. निशाणी २३ वर आरोपीच्या वकिलांचे म्हणणे घेतले. दोन्ही पक्षांचे ऐकले आणि निशाणी २३ वरचा अर्ज मंजूर केला. लिस्ट

निशाणी २४ सोबत जी स्कूल लिव्हिंग सर्टिफिकेटची कॉपी दाखल केली आहे. ती मुळ कॉपीप्रमाणे बरोबर आहे आणि मुळ कॉपीची कॉपी आहे. त्यामुळे त्याला निशाणी देण्यात येते आहे). या **दिव्याच्या १२ वीच्या शाळा सोडल्याच्या लिव्हिंग सर्टिफिकेटच्या झेरॉक्स कॉपीला आर्टिकल नि.क्र.पी–२४/सा.क्र. २ देण्यात येते.**

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान अधिवक्ता श्री. प्रविण ठाकूर यांच्यामार्फत सुरू.**

3. हे म्हणणे खरे आहे की मी दिव्याच्या जन्म दाखल्याची कॉपी पोलीसांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की जेव्हा फिर्यादी आणि आरोपीचे प्रेमसंबंध होते तेव्हा आम्ही पोलीसांकडे कोणतीही तक्रार केलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी माझी आरोपीविरूध्द कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे की, मुलीचे वय १७ वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे की, दिव्याचे आणि आरोपीचे प्रेमसंबंध होते आणि आरोपीने दिव्याला फसविले.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

(एम. बी. ओझा)
विशेष न्यायाधीश, पनवेल,
जिल्हा-रायगड.

पनवेल,
दिनांक :०८/०७/२०२६